# मुख्याध्यापक संघ बैठक दि.०६/०१/२०१७ इतिवृत्त

| अ.क्र. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | संचमान्यता दुरूस्तीबाबत शासन धोरण विस्तृत करणे. | धोरणात्मक बाब. संच मान्यता दुरूस्त करून त्याचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी व या कार्यालयामार्फत वरिष्ठ स्तरावर सादर करावयाचे आहेत. दुरूस्तीबाबत संघटना व कार्यालय स्तरावरून पाठपुरावा करण्यात यावा. | संघटना व या कार्यालय स्तरावर | --- |
| २. | अर्धवेळ असणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाबाबत. | अर्धवेळ पदांना दरवर्षी मान्यता करावी लागते. सध्या ऑनलाईन संचमान्यतेमध्ये अर्धवेळ शिक्षकांची पदे मंजूर होत नसल्याने वेतन देय ठरत नाही. | --- | --- |
| ३. | अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाबाबत. | मा. आयुक्त शिक्षण यांचे परिपत्रक दि.५/१/२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी. | शाळा व शिक्षणाधिकारी स्तर | तात्काळ |
| ४. | २००५ पूर्वीच्या मान्यता असलेल्या शिक्षकांची पेन्शन योजनेत खाती उघडणेबाबत. | न्यायप्रविष्ठ धोरणात्मक प्रश्न. | शासन स्तरावर | --- |
| ५. | तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी जिल्हा परिषदेकडून निधी मिळणेसाठी आपल्या स्तरावरून निधी मागणी होणेबाबत. | शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा परिषदेचा स्वीय निधी तसेच जिल्हा नियोजन समितीकडे पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून घ्यावा. | शिक्षणाधिकारी स्तर | --- |
| ६. | थकित वैद्यकीय बिले मिळणेबाबत. | वैद्यकीय बिले अदा करणेसाठी वेतन अनुदानातून आठमाही अंदाजपत्रकात मागणी करण्यात आली आहे. अनुदान प्राप्त होताच देयके अदा करण्यात येतील. | वेतन पथक स्तरावर | निधी उपलब्धतेनंतर |
| ७. | माध्यमिक विभाग, जि.प., कोल्हापूर या विभागासाठी शिस्त लावणेसाठी सूचना | यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षणाधिकारी यांनी कार्यालयातील प्रलंबित प्रकरणे निर्गत होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | --- |
| ८. | आदर्श कार्यालयीन कार्यपद्धतीची अंमलबजावणी. | विभागातील काही जिल्ह्यात कार्यवाही सुरू असून कार्यवाही सुरू नसलेल्या जिल्ह्यांनी आदर्श कार्यालयीन पद्धतीची अंमलबजावणी करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | तात्काळ |
| ९. | ज्या शाळांमध्ये नवीन निकषानुसार विद्यार्थी पटसंख्या अभावी मुख्याध्यापक पद मंजूर नाही, अशा शाळांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाची जबाबदारीबाबत. | याबाबत स्वतंत्र आदेश प्राप्त नाहीत. सेवाजेष्ठ शिक्षकाने शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेवून प्रभारी मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळावी. | --- | --- |
| १०. | ज्युनियर कॉलेज संचमान्यता कँप रत्नागिरी जिल्ह्यात आयोजित करणे. | सन २०१६-१७ च्या संचमान्यतेचे बहुतांशी कामकाज पूर्ण झाले आहे. पुढील शैक्षणिक वर्षात आवश्यकतेप्रमाणे नियोजन करण्यात येईल. | --- | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | अनुशेष तपासणीचे कँप आयोजित करणे. | अनुशेष तपासणी कँपप्रमाणे करण्यासाठी पुरेशी संख्या उपलब्ध होत नाहीत. शक्यतो कार्यालयाकडे प्राप्त प्रस्ताव कार्यालय प्रमुखांच्या उपलब्धतेनुसार ज्या त्या दिवशी अनुशेष तपासून दिले जातील. | --- | --- |
| १२ | ज्युनियर कॉलेज पदभरतीसाठी जाहिरात व पद भरणेस मान्यता मिळणे. | सध्या शासन निर्णय दि.१९/७/२०१४ नुसार कार्यवाही सुरू आहे. | --- | --- |
| १३. | शिष्यवृत्ती परीक्षा नोंदणी शुल्क. | परीक्षा परिषदेकडून एन्.टी.एस्., एन्.एम्.एम्.एस्.यासाठी नोंदणी शुल्क घेण्यात आले आहे. शिष्यवृत्ती परीक्षा नोंदणी शुल्कामुळे माध्यमिक विद्यार्थ्यांचे परीक्षा देण्याचे प्रमाण कमी झाले आहे, याबाबत परीक्षा परिषद स्तरावर विचार सुरू आहे. | ---- | --- |
| १४. | आरटीई निकषानुसार मान्यता. | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्रस्ताव सादर करून प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. याबाबत शिक्षणाधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत. | --- | --- |
| १५. | माध्यमिक विद्यालय, देवसू या माध्यमिक शाळेस पूर्वलक्षी प्रभावाने मुख्याध्यापक मंजूर करणेबाबत. | सदर शाळा मान्यतेच्या शासन आदेशातील अटी व शर्तीनुसार स्वतंत्र पद मिळणार नाही. शिक्षणाधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावाबाबत वरिष्ठ स्तरावर सकारात्मक शिफारस करण्यात येईल. | --- | --- |
| १६. | विभागातील ५०० मुख्याध्यापकांच्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यशाळेबाबत. | मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या आदेशानुसार विभागातील प्रत्येक जिल्ह्यातून क्रिएटीव्ह मुख्याध्यापकांचा सातारा जिल्ह्यात मेळावा घेण्यात येणार आहे. | --- | --- |

**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर**